# **बृहन्मुंबई महानगरपालिका**

**विषय**:- एन विभागामध्ये सर्वकष स्वच्छता मोहीम (Deep Cleaning Drive) तसेच डोंगराळ भागातील अडगळीच्या ठिकाणी कचरा काढून स्वच्छता करुन घेण्याकरीता आवश्यक श्रमदिन पुरविण्याच्या कामाकरीता सोडतीद्वारे संस्थेची नियुक्ती करणेबाबत.

स्वारस्य अभिव्यक्ती

जाहिरात

'एन' विभागामध्ये विषयांतर्गत कामाकरीता '**एन**' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा / श्रमदिनांचा पुरवठा करण्याकरीता प्रत्येक युनिट निहाय स्वतंत्र संस्थेची सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| युनिट क्र. | योजनेचे नाव | निवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) | EMD (Rs.) |
|---|---|---|---|---|
| **1** | घाटकोपर (पू) व परिसर | 01 | रु.330/- अधिक 18% GST एकूण रु.389.4/- | 3,000/- |
| **2** | घाटकोपर (प) व परिसर | 01 | रु.330/- अधिक 18% GST एकूण रु.389.4/- | 3,000/- |
| टिप:- विषयांकीत काम प्रभावीपणे नियमानुसार होणे अपेक्षीत आहे व नागरिकांच्या अरोग्याशी निगडीत असल्यामूळे अर्जदार संस्थेला मनपा मध्ये स्वच्छतेचे काम केलेचा अनुभव असणे बंधन कारक आहे. | | | | |

ईच्छूक संस्थांनी उपरोक्त तक्त्यात नमुद प्रत्येक युनिटच्या कामकरिता स्वतंत्र अर्ज करणे अपेक्षीत आहे. प्रत्येक युनिटच्या स्वतंत्र अर्जा करिता EMD लागू राहिल. प्रत्येक युनिटच्या कामाकरिता स्वतंत्र सोडत काढली जाईल.

अर्जाचा नमुना '**एन**' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन)यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. '**बृहन्मुंबई महानगरपालिका**' (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि.13.06.2024 ते दि.18.06.2024 पर्यंत सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 यावेळेत मिळु शकेल. तसेच दि.18.06.2024 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत मिळेल. अर्ज जमा करताना अर्जा सोबत दिलेल्या Annexure मध्ये नमूद सर्व कागदपत्रे व अनामत रक्कम रु.3,000/- भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. सोडतीचा दिनांक एन विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थेस कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थेचे काम समाधानकारक नसल्यास किंवा कामामध्ये त्रुटी आढळुन आल्यास म.न.पा.च्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम करण्यासापेक्ष देण्यात येईल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी '**एन**' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने '**एन**' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.18.06.2024 दुपारी 01.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त**

'**एन**' विभाग